# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

जाहीरात क्र. ७२५/पी.आर दि.०५/१२/२०२३

## 'पदभरतीची सविस्तर जाहिरात'

नागपूर शहर महानगरपालिका, नागपूर यांचे आस्थापनेवरील अग्निशमन व आणिबाणी सेवा या विभागातील खालील नमूद केलेल्या गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने (नामनिर्देशनाने) भरण्याकरीता आयोजित परीक्षेसाठी य जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पदाची शैक्षणिक अर्हता व इतर अटींची पूर्तता करण्या-या पात्र उमेदवारांकडुन विहीत मुदतीत नागपूर महानगरपालिका, नागपूर www.nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवित आहे

### १.१. परीक्षेसाठी अर्ज सादर करणेचे वेळापत्रक

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकृतीचा कालावधी | दि.०६.१२.२०२३ ते दि.२७.१२.२०२३ |
| २ | परीक्षेसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणेचा अंतिम दिंनाक | दि.२७.१२.२०२३ |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने विहीत परीक्षा शुल्क भरण्याचा दिंनाक | दि.०६.१२.२०२३ ते दि.२७.१२.२०२३ |
| ४ | परीक्षेकरीता प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | www.nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत येईल |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

१.१.१. वरील पद भरतीसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे सेवानिहाय परीक्षा ऑनलाईन पध्दतीने (Computer Based Test) विहीत करण्यात येणा-या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन, आवश्यकता असल्यास, सदर परीक्षा ही एकापेक्षा अधिक दिवशी व एकापेक्षा अधिक सत्रात घेण्यात येईल. अशा प्रत्येक सत्रातील परीक्षेसाठी विहीत केलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत वेगवेगळी प्रश्नपत्रिका असेल. संबंधीत उमेदवारास त्याचा प्रत्यक्ष परीक्षा दिनांक, वेळ व परीक्षा केंद्राचा तपशील परीक्षा प्रवेशपत्राद्वारे उपलब्ध होईल.

१.१.२. या वेळापत्रकामध्ये काही बदल झाल्यास, सुधारीत वेळापत्रक फक्त नागपूर महानगरपालिकेचे https://nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल.

१.१.३. परीक्षा व यापुढील निवड प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक परीक्षेच्या निकालानंतर नागपूर महानगरपालिकेचे https://nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१.१.४. वर नमूद पध्दतीऐवजी इतर कोणत्याही मार्गाने,वैयक्तिकरित्या उमेदवारास कळविण्यात येणार नाही सबब सर्व उमेदवार यांनी निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत नियमित वेळोवेळी वरील संकेतस्थळाला भेट द्यावी असा सल्ला देण्यात येत आहे

१.१.५. नागपूर महानगरपालिका अंतर्गत संवर्गनिहाय घेण्यात येणा-या परीक्षांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

OOAcademy/Pune 8010457160

| नागपूर महानगरपालिका अंतर्गत विविध पदांच्या भरतीसाठी आयोजित परीक्षेचे नाव व संख्या | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | परीक्षेचे नाव | पदाचे नाव | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | भरावयाची पद संख्या (स.से) |
| १ | अग्निशमन व आणिबाणी सेवा | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (Assistant Station Officer) | एस-१४ : रू ३८,६००-१,२२,८०० | ०७ |
| २ | | उप अग्निशमन अधिकारी (Sub Officer) | एस-१३: रू ३५,४००-१,१२,४०० | १३ |
| ३ | | चालक यंत्रचालक (Driver Operator) | एस-८: रू २५,५००-८१,१०० | २८ |
| ४ | | फिटर कम ड्रायव्हर (Fitter Cum Driver) | एस-८: रू २५,५००-८१,१०० | ०५ |
| ५ | | अग्निशामक विमोचक (Fireman Rescuer) | एस-६: रू १९,९००-६३,२०० | २९७ |
| | | एकूण | | ३५० |

**२.१. नागपूर महानगरपालिका सेवानिहाय भरतीसाठी उपलब्ध रिक्त पदांचा तपशील**

२.१.१ सदर भरतीमध्ये सरळसेवेची रिक्त असलेली आवश्यक पदे भरण्यात येणार असल्याने, जाहीरातीत नमूद करण्यात आलेली आरक्षित पदे निव्वळ अनुशेषानुसार दर्शविण्यात आलेली आहेत.

२.१.२ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग दि. ०६ जुलै, २०२१ चे शासन निर्णय चे धर्तीवर सरळसेवा भरतीसाठी आरक्षणाचा तपशील म.न.पा पदभरतीसाठी पुढीलप्रमाणे राहील. {अनुसूचित जाती-अ.जा, अनुसूचित जमाती- अ.ज , निरधारीत जमाती (विमुक्त जाती – अ (वि.जा.-अ)/ भटक्या जमाती –ब (भ.ज.-ब)/ भटक्या जमाती –क (भ.ज.-क)/ भटक्या जमाती –ड (भ.ज.-ड)), विशेष मागास प्रवर्ग- वि.मा.प्र., इतर मागास वर्ग- इ.मा.व., आर्थिकदृष्टया दूर्बल घटक- आ.दु.घ.,}व समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

**टिप:- पदभरती करावयाच्या पदांचे आरक्षणाचा तपशील हा, भरावयाची पदे व मंजूर संवर्गात कार्यरत प्रवर्गनिहाय पदे याचा विचार करून प्रवर्गनिहाय योग्य प्रतिनिधीत्व मिळणेचे दृष्टीकोणातून निश्चित करण्यात आला आहे.**

**नागपूर महानगरपालिका अग्निशमन सेवा गट-क**

**पदनाम- सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (Assistant Station Officer) भरावयाची रिक्त पदे -०७**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ. क्र | प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **एकूण पदे** | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | ३ | ७ |
| | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | | |
| | सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | २ | ६ |
| | महिला आरक्षण (३० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अनाथ (१ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण १००** | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ | ३ | ७ |

OOAcademy Pune 8010457760

## नागपूर महानगरपालिका अग्निशमन सेवा गट-क

### पदनाम- उप अग्निशमन अधिकारी (Sub Officer) भरावयाची रिक्त पदे -१३

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ. क्र | प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **एकूण पदे** | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | १ | ८ | ५ | १३ |
| | | | | | | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | |
| | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | ६ | १ | ७ |
| | महिला आरक्षण (३० %) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | २ | ४ |
| | माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | अनाथ (१ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण १००** | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | १ | ८ | ५ | १३ |

## नागपूर महानगरपालिका अग्निशमन सेवा गट-क

### पदनाम- चालक यंत्रचालक (Driver Operator) भरावयाची रिक्त पदे -२८

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ. क्र | प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **एकूण पदे** | २ | ४ | ० | २ | ० | १ | ० | ४ | ३ | १६ | १२ | २८ |
| | | | | | | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | |
| | सर्वसाधारण | १ | २ | ० | १ | ० | १ | ० | २ | २ | ९ | ३ | १२ |
| | महिला आरक्षण (३० %) | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | १ | ५ | ४ | ९ |
| | माजी सैनिक (१५ %) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | २ | ४ |
| | खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | भुकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | अनाथ (१ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण १००** | २ | ४ | ० | २ | ० | १ | ० | ४ | ३ | १६ | १२ | २८ |

OOAcademy Pune 8010457160

## नागपूर महानगरपालिका अग्निशमन सेवा गट-क

### पदनाम- फिटर कम ड्रायव्हर (Fitter Cum Driver) भरावयाची रिक्त पदे -०५

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ. क्र | प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण पदे | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | २ | ०५ |
| | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | | |
| | सर्वसाधारण | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | १ | ४ |
| | महिला आरक्षण (३० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अनाथ (१ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण १००** | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | २ | ५ |

## नागपूर महानगरपालिका अग्निशमन सेवा गट-क

### पदनाम- अग्निशामक विमोचक (Fireman Rescuer) भरावयाची रिक्त पदे -२९७

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ. क्र | प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण पदे | ३७ | २३ | ७ | ५ | १२ | ५ | ३ | ५० | ३० | १७२ | १२५ | २९७ |
| | **समांतर आरक्षणाचे विवरणपत्र** | | | | | | | | | | | | |
| | सर्वसाधारण | ११ | ९ | ३ | १ | ३ | १ | २ | १४ | ८ | ५२ | ३९ | ९१ |
| | महिला आरक्षण (३० %) | ११ | ७ | २ | २ | ४ | २ | १ | १५ | ९ | ५३ | ३८ | ९१ |
| | माजी सैनिक (१५ %) | ६ | ३ | १ | १ | २ | १ | ० | ८ | ५ | २७ | १९ | ४६ |
| | खेळाडु (५ %) | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | २ | ९ | ६ | १५ |
| | प्रकल्पग्रस्त (५ %) | २ | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | २ | ९ | ६ | १५ |
| | भुकंपग्रस्त (२ %) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | ३ | ६ |
| | अंशकालीन (१० %) | ४ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | ३ | १८ | १३ | ३१ |
| | अनाथ (१ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | २ |
| | **एकूण १००** | ३७ | २३ | ७ | ५ | १२ | ५ | ३ | ५० | ३० | १७२ | १२५ | २९७ |

# <u>पदनिहाय आवश्यक शैक्षणिक पात्रता</u>

| अक्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | **सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी**<br>**(Assistant Station Officer) गट-क** | **अ) शैक्षणिक पात्रता**<br>१)कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२)राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा स्टेशन ऑफिसर अँण्ड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील पदविका) उत्तीर्ण असावा, **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा **किंवा** दि इन्स्टीटयूट ऑफ फायर ईंजिनिअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड-आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br>४)एम.एस.सी.आय. टी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारीरिक पात्रता:**<br>अ) उंची - १६५ से. मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १६२ से.मी.)<br>ब) छाती - साधारण ८१ से.मी.-फुगवून ५ से. मी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क) वजन - किमान ५० कि. ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली<br>**क) अनुभव :**<br>"अ" वर्ग महानगरपालिका/ महानगरपालिका/ विशेष नियोजन प्राधिकरण/ शासकीय/ निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये उप-अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्ष सेवा पूर्ण केलेली असावी. किंवा "ब"व"क" वर्ग महानगरपालिकामध्ये उप-अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ५ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**ड) वयोमर्यादा-**<br>१) सरळसेवेच्या उमेदवाराचे वय ४२ (४०+२) वर्षापेक्षा जास्त असू नये.<br>२) शासकीय/ निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट लागू राहणार नाही. |
| २ | **उप अग्निशमन अधिकारी (Sub Officer) गट-क** | **अ) शैक्षणिक पात्रता**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा उप अग्निशमन अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा,**किंवा** महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा **किंवा** दि इन्स्टीटयूट ऑफ फायर इंजिनीअर्स (यु.के) किंवा (इंडीया) या संस्थेकडून ग्रेड-आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>४) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारीरिक पात्रता:**<br>अ) उंची - १६५ से. मी. (महिला अमेदवारांसाठी उंची १६२ से.मी.)<br>ब) छाती - साधारण ८१ से.मी.-फुगवून ५ से. मी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क)वजन - किमान ५० कि. ग्रॅ.<br>दृष्टी - चांगली |

OOAcademy Pune 8010457160

| | | |
|---|---|---|
| | | **क) <u>अनुभव :</u>**<br>'ब' व 'क' वर्ग महानगरपालिकामध्ये प्रमुख अग्निशमक – विमोचक या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ५ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेली असावी किंवा 'ड' वर्ग महानगरपालिकामध्ये प्रमुख अग्निशामक-विमोचक या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ७ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**ड) <u>वयोमर्यादा:-</u>**<br>१) सरळसेवेच्या उमेदवाराचे वय ३७ (३५+२) वर्षापेक्षा जास्त असू नये<br>२) शासकीय / निमशासकीय **अग्निशमन सेवेमध्ये** कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट ४७ (४५+२) वर्षापर्यंत शिथिल राहील. |
| ३ | **<u>चालक यंत्रचालक</u>**<br>**<u>(DriverOperator)</u>**<br>**<u>गट-क</u>** | **अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>**<br>१) माध्यमीक शालांत परीक्षा उत्तीर्ण असने आवश्यक<br>२) जड वाहनचालक म्हणून ३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक<br>३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>४) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>५) राज्य अगिनशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अगिनशमक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असल्यास प्राधान्य<br>**ब) <u>किमान शारीरिक पात्रता:</u>**<br>अ) उंची - १६५ से. मी. (महिला उमेदवारांसाठी उंची १६२ से.मी.)<br>ब) छाती - साधारण ८१ से.मी.-फुगवून ५ से. मी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क)वजन - किमान ५० कि. ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली<br>**क) <u>पाठयक्रम :</u>**<br>उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षन केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा पाठयक्रम पूर्ण केला नसेल तर त्या सदर प्रशिक्षण केंद्राचा ३ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करणे आवश्यक राहील.<br>**ड) <u>वयोमर्यादा:</u>**<br>उमेदवाराचे वय ३२ (३०+२) वर्षापेक्षा जास्त असू नये. |
| ४ | **<u>फिटर कम ड्रायव्हर</u>**<br>**<u>(Fitter Cum Driver)</u>**<br>**<u>गट-क</u>** | **अ) <u>शैक्षणिक पात्रता</u>**<br>१) माध्यमीक शालांत परीक्षा उत्तीर्ण असावा<br>२) आय.टी. आय मधील मोटर मॅक्यानिकल/ डिझेल मॅक्यानिक /समकक्ष कोर्स उत्तीर्ण असावा.<br>३) जड वाहन चालविण्याचा कमीतकमी ३ वर्षांचा अनुभव असावा<br>४) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>५) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>६) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) <u>वयोमर्यादा :-</u>**<br>७) आराखीव प्रवर्गाकरीता वयोमर्यादा किमान १८ वर्ष कमाल ३५ (३३+२) वर्ष. आरक्षीत प्रवर्गसाठी किमान १८ वर्ष व कमाल ४० (३८+२) वर्षे. |
| ५ | **<u>अग्निशामक विमोचक</u>**<br>**<u>(Fireman Rescuer)</u>**<br>**<u>गट-क</u>** | **अ) <u>शैक्षणिक अर्हता</u>**<br>१. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असने आवश्यक.<br>२. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा पाठयक्रम उत्तीर्ण असावा<br>**किंवा**<br>महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ यांचे कडील किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| | |
|---|---|
| | ३. . मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>४. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असावा.<br><br>**<u>ब) किमान शारीरिक पात्रता:</u>**<br>अ) उंची - १६५ से. मी. (महिला अमेदवारांसाठी उंची १६२ से.मी.)<br>ब) छाती - साधारण ८१ से.मी.-फुगवून ५ से. मी जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>क)वजन - किमान ५० कि.ग्रॅ.<br>ड) दृष्टी - चांगली<br><br>**वयोमर्यादा :-**<br>उमेदवाराचे वय ३२ (३०+२) वर्षापेक्षा जास्त असू नये. |

**३.१. <u>पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-</u>**

३.१.१. जाहीरातीत नमूद केलेल्या पद संख्येत व प्रवर्गनिहाय आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

३.१.२. पदसंख्या व आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतची घोषणा/ सूचना वेळोवेळी नागपूर महानगरपालिकेचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/ सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

३.१.३. परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक, म.न.पा यांचे कडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

३.१.४. महिला, खेळाडु, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त , भुकंपग्रस्त , अंशकालीन तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण (दिव्यांग आरक्षण वगळून) शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या प्रचलित आदेश/ नियम यानुसार राहील.

३.१.५. विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, अनाथ इं. साठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

३.१.६. महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेयर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. तसेच महिला व बालविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र. महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दिनांक ०४.०५.२०२३ नुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागासप्रवर्गातील महिलांनी नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

३.१.७. एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधीत जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

३.१.८. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर,२०१८ आणि तद्नंतर शासनाने यासदंर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.१.९. आर्थिकद्दष्टया दूर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रूवारी, २०१९ व दिनांक ३१ मे,२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. आर्थिक दूर्बल

OOAcademyPune8010457760

घटकांतील उमेदवारांच्या प्रमाणपत्रांच्या ग्राहता कालावधी शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो२०२३/प्र.क्र.४०/१६-अ,दि.२३ मार्च, २०२३ नुसार समजण्यात येईल.

३.१.१०. अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र / आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.१.११. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.१.१२. आराखीव (खुला) उमेदवाराकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषसंदर्भातील अटीची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३.१.१३. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

३.१.१४. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (समाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधीत कायदा/ नियम/ आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्राच्या कालावधी संबंधीत शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागु असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येतील.

३.१.१५. सामाजिक व समांतर आरक्षणा संदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३.१.१६. शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक बीबीसी-१११८३/११८/१६-ब दिनांक २५ जानेवारी १९८९ मधील तरतुदी नुसार आरक्षित पदासाठी अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्राचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा व महाराष्ट्र राज्यासाठी अधिसुचित केलेल्या संबंधित प्रवर्गातील असावा.

३.१.१७. वर नमूद माजी सैनिक, खेळाडू, महिला, पदवीधर अंशकालीन उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अनाथ मुले यांचेकरीता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ठ आहे. तसेच माजी सैनिक, खेळाडू, महिला, पदवीधर अंशकालीन उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अनाथ मुले यांच्यासाठीचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३.१.१८. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांचा ज्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असलेल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) ऑनलाईन अर्ज सादर करतांना सादर करणे आवश्यक आहे.

३.१.१९. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी - २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाचया औरंगाबाद खंडपीठाने दि. २५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

OOAcademy Pune 8010457760

३.१.२०. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधीत वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

४.१ **खेळाडू आरक्षण :-**

४.१.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दिनांक १८ ऑगस्ट,२०१६ व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दि. ३० जून २०२२ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता प्राविण्य प्रमाणपत्र तो ज्या क्रिडा विभागात वास्तव्यास आहे त्या विभागातील उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांचेकडे परीक्षेस अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकापुर्वीच प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केलेला असणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडूने कोणत्या विभागातील उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे हे आवेदन अर्जात नमूद करणे व अर्ज सादर केल्याची पोच पावती सोबत जोडणे बंधनकारक आहे किंवा उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांचेकडून आधीच प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणीची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील.

४.१.४ सक्षम क्रिडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रिडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रिडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

४.१.५ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी संबंधित संवर्ग /पदाकरीता विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता उमेदवार पात्र ठरतो, याविषयी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले विहित दिनांकास वैध असलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता विचार करण्यात येईल.

४.१.६ एकापेक्षा जास्त खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१.७ खेळाडू प्रवर्गातून निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची क्रिडा प्रमाणपत्रे पुर्नपडताळणीसाठी आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे यांच्या पाठविण्यात येतील आणि त्यांचेकडून वैध खेळाडू प्रमाणपत्रे पडताळणी अहवाल दिल्याशिवाय शासन सेवेत नियुक्ती दिली जाणार नाही.

५.१ **अनाथ आरक्षण :-**

५.१.१ महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक ०२ एप्रिल २०१८ च्या तरतुदीनुसार अनाथ मुलांसाठी खुल्या (अराखीव) प्रवर्गातून १ % समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.

OOAcademy Pune 8010457

५.१.२ प्रस्तुत पदासाठी अर्ज करतांना अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अनाथ -२०२२/प्र.क्र.१२२/का-०३ दिनांक ०६ एप्रिल २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

५.१.३ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

५.१.४ अर्जाव्दारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दि. ०६ सप्टेंबर २०२२ आणि दि. ०६ एप्रिल २०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

५.१.५ अनाथ आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी दि. ०६ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून सुधारित नमुन्यातील विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्याकडून वितरित करण्यात आलेले "संस्थात्मक" किंवा "संस्थाबाहय" अनाथ प्रमाणपत्र परीक्षेच्या अर्जासोबत सादर/अपलोड करणे आवश्यक आहे किंवा दि. ०६ एप्रिल २०२३ रोजीचा शासन निर्णय अंमलात येण्यापूर्वी ज्या पात्र अनाथांना महिला व बालविकास विभागामार्फत "अ" व "ब" प्रवर्गाचे अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे त्यांना "संस्थात्मक" प्रवर्गातील अनाथ समजण्यात येईल. पुर्वीच्या "क" प्रवर्गाचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेल्या अनाथांना "संस्थाबाहय" प्रवर्गातील अनाथ समजण्यात येईल व सदर अनाथ प्रमाणपत्र परीक्षेच्या अर्जासोबत सादर / अपलोड करणे आवश्यक आहे.

५.१.६ अनाथ या घटकाकरीता जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या (अराखीव) प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

**६.१. <u>माजी सैनिक आरक्षण :-</u>**

६.१.१ उमेदवार स्वत:माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

६.१.२ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

**७.१ <u>प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :-</u>**

७.१.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २० जानेवारी, १९८० तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**८.१ <u>भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-</u>**

८.१.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि. २७ ऑगस्ट २००९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

८.१.२ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ च्या तरतुदीनुसार भूकंपाग्रस्तांसाठी राखीव असलेल्या २ % पदांवर नियुक्तीसाठी ज्या कुटुंबातील व्यक्तींचे भूकंपात निधन झाले आहे किंवा ज्यांचे घर पूर्णपणे कोसळले होते, त्यामुळे त्यांना शासनाने नवीन घर बांधून दिले अशा व्यक्तींचे पाल्य नियुक्तीसाठी पात्र ठरतील. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी ५ % व भूकंपग्रस्तांसाठी २ % असे स्वतंत्र आरक्षण विहित केलेले असले तरी भरती प्रक्रियेमध्ये भूकंपग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पदांवर भूकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाही, तर ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी

OOAcademyPune8010457760

वापरण्यात येतील. अशा प्रकारे भूकंपग्रस्तासाठी राखीव असलेल्या पदांवर प्रकल्पग्रस्तांची नियुक्ती झाली तर, प्रकल्पग्रस्त उमेदवाराकडे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

९.१ **पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार**

९.१.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक: अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ दिनांक: १९ सप्टेंबर २०१३ नुसार पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील नियुक्त्यासाठी असलेले १० टक्के आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे या घटकाकरीता जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षित पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

९.१.२ पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी शासन सेवेत प्रवेश मिळाल्यास (निवड झाल्यास), त्यांनी त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून ३ वर्षाच्या अनुभवाची / अनुभवाबाबत मिळालेले मूळ प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या प्रतीसह व तहसिलदार/ सक्षम प्राधिकारी सूपूर्द करणे आवश्यक राहील.

१०.१ **दिव्यांग आरक्षण :-**

**नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचे सेवाप्रवेश नियमानुसार अग्निशमन सेवेतील विविध पदांकरीता दिव्यांगकरीता आरक्षण लागु राहणार नाही.**

**११.१ पात्रता :-**

११.१.१ भारतीय नागरिकत्व

**११.१.२ वयोमर्यादा :-**

**(सर्व पदासाठी)**:- अग्निशमन विभागातील सदर पदांकरीता वयोमर्यादा नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी सेवेच्या मंजुर सेवाप्रवेश नियमानुसार विविध पदांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादेनुसार व शिथिलतेसह खालीलप्रमाणे लागु राहील.

११.१.३ नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी वयोमर्यादा अन्यथा विहीत केली नसेल तेव्हा, विभागाच्या आस्थापनेवर त्यांच्या झालेल्या सेवेच्या वर्षेइतकी किंवा ७ वर्षे यापैकी जास्त असेल तेवढी वर्षे शिथिलक्षम राहील.

११.१.४ कोणत्याही पदांकरीता शिथिलतेसह कमाल वयोमर्यादा अन्यथा विहीत केली नसल्यास ५५ वर्ष पेक्षा जास्त अनुज्ञेय राहणार नाही.

११.१.५ सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र. सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या १२, दि. ०३ मार्च, २०२३ अन्वये दिनांक २५ एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात आली आहे. सरळसेवेने नियुक्तीसाठीच्या कमाल वयोमर्यादेत दि.३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत शिथिलता देण्यात येत आहे.

११.१.६ नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाचे सेवाप्रवेश नियमानुसार **सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी (Assistant Station Officer)** यांना शासकिय/निमशासकिय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांसाठी वयाची अट लागू नाही. तथापि, अर्ज करावयाची शेवटच्या विहीत दिनांकास कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी राहील.

११.१.७ एखादा उमेदवार वयोमर्यादेतील सवलतीपैकी एकापेक्षा जास्त सवलतीकरीता पात्र ठरत असल्यास पात्र सवलतीपैकी अधिकतम सवलत अनुज्ञेय राहील.

११.१.८ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र सैनिकांचे पाल्य यांचे करिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

| म.न.पा अग्निशमन सेवेसाठी शिथिलतेसह कमाल वयोमर्यादा | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अक्र | पदाचे नाव | किमान | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ./ अनाथ | माजी सैनिक | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त | पदवीधर/ पदवीधारक अंशकालीन उमेदवार |
| | | | | | अराखीव | मागासवर्गीय आ.दु.घ./ अनाथ | अराखीव | मागासवर्गीय आ.दु.घ./ अनाथ | | |
| १ | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | १८ | ४२ (४०+२) | ४२ (४०+२) | ४०+सेवा+३ | | ४३ | | ४५ | ५५ |
| २ | उप अग्निशमन अधिकारी | १८ | ३७ (३५+२) | ३७ (३५+२) | ३५ + सेवा +३ | | ४० | | ४५ | ५५ |
| ३ | चालक यंत्र चालक | १८ | ३२ (३०+२) | ३२ (३०+२) | ३० + सेवा +३ | | ३५ | | ४५ | ५५ |
| ४ | अग्निशामक विमोचक | १८ | ३२ (३०+२) | ३२ (३०+२) | ३० + सेवा +३ | | ३५ | | ४५ | ५५ |
| ५ | फिटर कम ड्रायव्हर | १८ | ३५ (३३+२) | ४० (३८+२) | ३३ + सेवा +३ | ३५ + सेवा +३ | ३८ | ४३ | ४५ | ५५ |

**१२.१ शारीरिक अर्हता :-**

**१२.१.१** नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन सेवा संवर्ग गट-क संवर्गाकरीता ऑनलाईन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराकडे उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालील प्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे.

| अक्र | बाब | पुरुष | महिला |
|---|---|---|---|
| १ | उंची | १६५ से.मी. | उंची - १६२ से.मी. |
| २ | वजन | ५० किलोग्रॅम | ५० किलोग्रॅम |
| ३ | छाती | न फुगवता – ८१ से.मी.<br>फुगवून -८६ से.मी. (किमान ५ से.मि फुगवणे आवश्यक राहील) | महिला उमेदवारांसाठी लागू नाही |
| ४ | दृष्टी | सामान्य (उपरोक्त शारीरीक पात्रता नसणारे उमेदवार पुढील चाचणीसाठी पात्र ठरणार नाही) | सामान्य |

**१२.१.२ शारीरिक क्षमता चाचणी**

| अ.क्र | शारीरिक परीक्षेची तपशील | गुण |
|---|---|---|
| १ | १५ फुट दोर चढणे | १५ गुण |
| २ | १०० मीटर्स अंतर ५० किलोग्रॅम मानवी प्रतिकृती खांद्यावर घेवून धावणे | १५ गुण |
| ३ | शिडी चढणे/ उतरणे | १५ गुण |
| ४ | उंची - (अधिक असल्यास) | ०५ गुण |
| ५ | पोहणे | २० गुण |
| | एकूण | **७० गुण** |

**महत्वाची सूचना :-**

१२.१.३ उपरोक्त नमूद केलेल्या शारीरिक मोजमाप व मैदानी चाचण्यापैकी कोणत्याही एका शारीरीक मोजमापामध्ये / चाचणीमध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पुढील उर्वरीत चाचण्या घेण्यात येणार नाहीत व त्याला निवड प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. सदर कामी संबंधीत चाचण्या घेण्यासाठी नेमणूक करण्यात आलेल्या नियंत्रन अधिकारी यांचा निर्णय अंतीम राहील.(उदाहरणार्थ :-शारीरिक मोजमापामध्ये नियमानुसार

OOAcademy Pune 8010457160

आवश्यक असलेल्या किमान मोजमापापेक्षा कमी मोजमापे असल्यास अशा उमेदवारांना पुढील शारीरिक क्षमता चाचणी अपात्र ठरविण्यात येईल.)

१२.१.४ अग्निशमन व आणिबाणी सेवेतील पदांकरीता पोहणे आवश्यक असल्याने पोहता न येणा-या उमेदवारांना पुढील चाचणीकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

**१२.१.५** जाहीरातीस असणारा एकूण प्रतिसादाचा विचार करून उमेदवारांना शारीरिक चाचणी परिक्षेस पात्र करण्यात येईल.या लेखी परीक्षेत सर्व साधारणत: आवश्यक पदांच्या १:५ किंवा १:७ या प्रमाणात अथवा जाहिरातीस असणारा एकूण प्रतिसादाचा विचार करून उमेदवारांना शारीरिक चाचणी परिक्षेस पात्र करण्यात येईल. तथापि, चालक यंत्र चालक या पदांसाठी लेखी परिक्षा नसेल.

**१२.१.६** शारीरिक क्षमता चाचणी गुणांकन नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात येईल.

**१३.१ <u>इतर अर्हता (सर्व पदासाठी) :-</u>**

**१३.१.१ <u>संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान :-</u>**

१. उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी बाबतची शासनाने विहित केलेले एम.एस.सी.आय.टी प्रमाणपत्र/ समकक्ष परिक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र ऑनलाईन स्वरुपात अर्ज सादर करतांना आवश्यक राहील

२. सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान), विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि. ०४.०२.२०१३, दि. ०८.०१.२०१८ व दि. १६.०७.२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील नमूद केलेल्या संगणक/ माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

a) D.O.E.A.C.C./ N.E.I.L.I.T. नवी दिल्ली चे प्रमाणपत्रधारक.

b) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

c) केंद्रीय माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाची इयत्ता दहावी व इयत्ता 12 वी ची परीक्षा संगणक/ माहिती तंत्रज्ञान हे विषय घेऊन उत्तीर्ण.

d) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology) / संगणक अभियांत्रिकी (Computer Engineering) / माहिती तंत्रज्ञान (Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी / पदविका व संगणक उपाययोजन(Computer Application) संगणक उपाययोजन पध्दती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma), सर्व शासन मान्य विद्यापीठातील संगणक तंत्रशास्त्र (Computer Technology) / संगणक अभियांत्रिकी (Computer Engineering) / माहिती तंत्रज्ञान Information Technology) या विषयाचा राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा पदवी / पदविका व संगणक उपायोजना (Computer Application), संगणक उपायोजन पध्दती व पृथक्करण (ADCSSAA) या पदव्युत्तर प्रगत पदविका (Advance Diploma) उत्तीर्ण

e) सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान), विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९ दि. ०४.०२.२०१३ मधील व्यवसाय शिक्षण मंडळामार्फत चालविण्यात येणारे, परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेले संगणक विषयी ८६ अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्रधारक.

f) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदवीका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

g) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

**१३.१.२ <u>मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक</u>**

**१३.१.३ <u>अर्हता / पात्रता गणण्याचा दिनांक</u>**

विहित शैक्षणिक अर्हता/वय/अनुभव/पात्रता विषयक अर्हता धारण केल्याचा दिनांक हा अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक गणला जाईल.

**१४.१ <u>निवडप्रक्रिया</u>:-**

१४.१.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

१४.१.२ सेवा भरतींची संपूर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा तसेच म.न.पा द्वारे वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

१) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील, नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचे सेवाप्रवेश नियम दि.१२ मे, २०१७

२) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील,नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचे सेवाप्रवेश नियम दि.१८ मार्च, २०२१

**१४.२ <u>निवडीची पध्दत</u> :-**

१४.२.१ सर्व पदांसाठी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या केंद्रावर घेण्यात येईल.

१४.२.२ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.४५/का.१३-अ, दि. ०४ मे, २०२२ नुसार ऑनलाईन परिक्षेमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची तयार करण्यात येईल तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाचे सेवाप्रवेश नियम दि.१२ मे,२०१७ अन्वये शारीरिक पात्रता/ क्षमता चाचणी चे पात्रतेसाठी लेखी परिक्षेत मागासवर्गीय उमेदवारांसाठी किमान ४५ टक्के गुण आणि अराखीव उमेदवारांसाठी किमान ५० टक्के गुणांची अट लागु राहील.

१४.२.३ लेखी परीक्षेत मागासवर्गीय उमेदवार यांना ४५ टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यामुळे पर्याप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास जाहिरातीत नमूद केलेली पदे रिक्त राहत असली तरीही कोणत्याही परिस्थिती किमान पात्र गुणांची टक्केवारी (४५%) पेक्षा कमी केली जाणार नाही आणि अराखीव उमेदवारांसाठी ५० टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यामुळे पर्याप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास जाहिरातीत नमूद केलेली पदे रिक्त राहत असली तरीही कोणत्याही परिस्थिती किमान पात्र गुणांची टक्केवारी (५०%) पेक्षा कमी केली जाणार नाही तसेच याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्यास त्यावर विचार केला जाणार नाही. सदरील निवेदने कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील.

१४.२.४ शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे, २०२२ मधील तरतूदीनुसार संवर्ग क्र.१ ते ५ या सर्व पदांकरीता मौखिक (मुलाखती) परीक्षा घेण्यात येणार नाहीत.

**१४.२.५ लेखी परीक्षा (१०० गुण), शारीरिक पात्रता व शारीरिक चाचणी (७० गुण) यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या एकूण १७० गुणांच्या आधारे निवडसूची तयार करून निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल.तथापि, चालक यंत्र चालक या पदाकरीता लेखी परिक्षा नसुन वरील सर्व शारीरिक पात्रता व शारीरिक क्षमता चाचणीसह प्रत्यक्ष जड वाहन चालविणेबाबत चाचणीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्यास एकूण ३० गुण राहतील, असे**

**एकूण १०० (७०+३०) गुणांपैकी प्राप्त एकूण गुणानुसार चालक यंत्र चालक या पदाकरीता गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. (लेखी परिक्षेत प्रत्येक प्रश्नासाठी एक गुण राहील)**

१४.२.६ उमेदवार कोणत्या प्रवर्गाचा आहे अथवा उमेदवाराने कोणत्या आरक्षित पदाकरिता दावा केला आहे, याचा विचार न करता सर्व पात्र उमेदवारांचा अमागास (सर्वसाधारण/अराखीव) पदांसाठी प्रथम विचार करण्यात येईल. सदर प्रक्रिया सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक :एसआव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि. १३ ऑगस्ट, २०१४ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक : संकीर्ण- १११८/प्र.क्र.३९/१६-अ दि. १९ डिसेंबर २०१८ मधील कार्यपध्दतीनुसार तसेच या मध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार करण्यात येईल.

१४.२.७ निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या ही जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त / उपलब्ध पद संख्येनुसार प्रवर्गनिहाय सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि. ०४ मे, २०२२ मधील परिच्छेद १० मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे तयार करण्यात येईल.

| प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या एकूण (प्रतिक्षा यादीसह)उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते. |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के |

१४.२.८ अंतिम निवड केलेल्या उमेदवारांची यादी नागपूर महानगरपालिकेचे www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१४.२.९ भविष्यात कुठल्याही कारणास्तव कोणत्याही संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील पद रिक्त झाल्यास किंवा रिक्त राहील्यास कनिष्ठ पदावरील उमेदवारास रिक्त होणाऱ्या पदावर हक्क सांगता येणार नाही किंवा श्रेणीवाढ करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. याबाबतची निवेदने प्राप्त झाल्यास कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील.

**१४.२.१० <u>समान गुण धारण करणा-या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी</u> :-**

**अ)** आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

**ब)** समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेवारास प्राधान्य देण्यात येईल.

**क)** वरील अनु.क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**ड)** वरील अनु.क्र. (अ) ,(ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहीत असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारस प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(**टीप:** आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटंबास शेतक-याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतक-याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय.)

OOAcademy Pune 8010457160

**१४.२.११ निवडसूचीची कालमर्यादा :-**

अ) शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि. ०४ मे, २०२२ मधील परिच्छेद १० मधील तदतुदीनुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील.त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

ब) निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र/अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अशी पदे नियमानुसार निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून भरण्यात येतील. मात्र, अशी कार्यवाही निवडसूचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

**१५.१ परीक्षेचे स्वरूप :-**

१५.१.१ नागपूर महानगरपालिकेचे संवर्गनिहाय खालीलप्रमाणे स्वतंत्र **बहुपर्यायी वस्तुनिष्ठ** ऑनलाईन पद्धतीने परीक्षा (Computer Based Test) घेण्यात येईल. प्रत्येक परीक्षेसाठी परिक्षेचा एकूण कालावधी दोन तास राहील.

| पदनाम | विषय (प्रश्न संख्य) | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्य | गुण |
|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | मराठी-१५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | ६० |
| | इंग्रजी-१५ प्रश्न | | इंग्रजी | | |
| | बौध्दीक चाचणी-१५ प्रश्न<br>सामान्य ज्ञान-१५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | |
| | तांत्रीक – ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ४० |
| उप अग्निशमन अधिकारी | मराठी-१५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | ६० |
| | इंग्रजी-१५ प्रश्न | | इंग्रजी | | |
| | बौध्दीक चाचणी-१५ प्रश्न<br>सामान्य ज्ञान-१५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | |
| | तांत्रीक – ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ४० |
| फिटर कम ड्रायवर | मराठी-१५ प्रश्न | माध्यमिक शाळा (१० वीं) | मराठी | ६० | ६० |
| | इंग्रजी-१५ प्रश्न | | इंग्रजी | | |
| | बौध्दीक चाचणी-१५ प्रश्न<br>सामान्य ज्ञान-१५ प्रश्न | | मराठी व इंग्रजी | | |
| | तांत्रीक – ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ४० |
| अग्निशामक विमोचक | मराठी-१५ प्रश्न | माध्यमिक शाळा (१० वीं) | मराठी | ६० | ६० |
| | इंग्रजी-१५ प्रश्न | | इंग्रजी | | |
| | बौध्दीक चाचणी-१५ प्रश्न<br>सामान्य ज्ञान-१५ प्रश्न | | मराठी व इंग्रजी | | |
| | तांत्रीक – ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ४० |

१५.१.२ उपरोक्त प्रत्येक संवर्गाकरीता वेगवेगळ्या/ स्वतंत्र परीक्षा घेण्यात येतील तसेच Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असेल.

**१६.१ परीक्षेकरीता अर्ज करण्याची पद्धत:-**

१६.१.१ नागपूर महानगरपालिकाचे www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन खाते उघडणे.

OOAcademyPune8010457160

१६.१.२ विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

१६.१.३ परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

१६.१.४ प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

१७.१ **विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

(अ) विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास ऑनलाईन अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ क्र | प्रमाणपत्र / कागदपत्र | फाईल फॉरमेट | किमान फाईल साईज | कमाल फाईल साईज |
|---|---|---|---|---|
| १ | अधिवास प्रमाणपत्र पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| २ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ३ | वयाचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ४ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ५ | सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ७ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ९ | खेळाडू आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १० | अनाथ आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ११ | प्रकल्पग्रस्त आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १२ | भुकंपग्रस्त आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १३ | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १४ | नावात बदल झाला असल्यास पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १५ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १६ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १७ | अनुभव बाबतचे प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १८ | संगणक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |

**ब)** अर्ज करतेवेळी अपलोड केलेल्या दस्ताऐवजांची पडताळणी ऑनलाईन परीक्षेसाठी पात्र करतांना करण्यात येणार नसुन अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरलेली माहिती व अपलोड केलेले दस्तऐवज खरे आहेत असे गृहीत धरून लेखी परीक्षेसाठी अनुज्ञेय ठरविले जाईल.तथापी लेखी परीक्षेसाठी अनुज्ञेय ठरवले याचा अर्थ त्याची पात्रता विहीत निकषंची तपासणी करून ठरवली आहे, असे समजता येणार नाही.

**क)** आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.

OOAcademyPune 8010457601

ड) लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या/दस्तऐवजाच्या साक्षांकित प्रती ,मुळ प्रमाणपत्राचे आधारे कागदपत्रे तपासणीवेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

ई) केवळ लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे आवश्यक गुणवत्तेनुसार पात्र केलेल्या उमेदवारांची कागदपत्र/दस्तऐवज पडताळणी व शारीरीक पात्रता पडताळणी करण्यात येईल व यात पात्र असलेल्या उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल.

**१८.१ <u>सर्वसाधारण</u> :-**

**१८.१.१** उक्त सर्व पदांसाठी अर्ज फक्त नागपूर महानगरपालिकेचे ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

**१८.१.२** अर्ज नागपूर महानगरपालिकेचे संकेतस्थळ:- https:// www.nmcnagpur.gov.in वरून करता येईल.

**१८.१.३** अर्ज सादर करण्याच्या सूचना नागपूर महानगरपालिकेचे https:// www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१८.१.४** नागपूर महानगरपालिका येथे अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत ऑनलाईन स्वरुपात परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही. ऑनलाईन स्वरुपात फी चा भरणी केल्यानंतर अर्ज **<u>"Your Application is Successfully Submitted "</u>** असा मॅसेज येईलपर्यंत उमेदवारांना लॉग आऊट करू नये. अर्ज **Successfully Submit** झाल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.

**१९ इतर सर्वसाधारण अटी/शर्ती /सूचना**

१९.१. पात्रता/आरक्षणा संदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे.अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्टयार्थ आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्याशिवायपात्रता/आरक्षणाचा दावा ग्राहय समजला जाणार नाही.

१९.२. अर्जदाराने त्याचे पात्रते संदर्भातील सर्व आवश्यक दस्तऐवज/ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील अन्यथा संबंधीत उमेदवार शारीरीक पात्रता चाचणी व शारीरीक क्षमता चाचणी साठी अपात्र ठरू शकेल.

१९.३. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी/रहीवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे.

१९.४. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेची प्रवेशपत्रे, परिक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे, पदताळणीसाठी पात्र अमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त सूची, अंतिम निवड व अतिरिक्त सूची व इतर सर्व सूचना हया वेळोवेळी या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतील त्याबाबत उमेदवारांसोबत पत्रव्यवहार अथवा वेगळ्याने संपर्क केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यन्त वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थाळावरील सूचना पाहिल्या नाही या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दाखल घेतली जाणार नाही.

१९.५. निवड झालेल्या उमेदवारांला नियमित तत्वावर नियुक्ती नंतर नागपूर महानगरपालिका सेवा विनियम लागु होतील.

१९.६. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा-४ दिनांक ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना (Defined Contribution Pension Scheme-DCPS) लागु राहील.

१९.७. शासन निर्णय क्र संकीर्ण/२००७/पडताळणी नवी-२६ दि. २१/११/२००७ अन्वये निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेली नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबधीत पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/तीची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

१९.८. महाराष्ट्र शासनाकडीत आदेश क्र. एस. आर. व्ही-२०००/प्र.क्र. १७/२०००/२०१२ दि.०१/०७/२००५ नुसार लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१९.९. नमूद पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची नागपूर महानगरपालिकेचे रुग्णालय यांच्याकडून वैद्यकिय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकिय दृष्टया पात्र झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल.उमेदवारांनी नौकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल.अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत

१९.१०. नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारानी विहित केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादी विशिष्ठ स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महापालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाहीत.

१९.११. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवारांची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांचे अर्जात व ऑनलाईन परिक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी निवड, नियुक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१९.१२. महापालिकेने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी पात्र उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१९.१३. निवड झालेल्या उमेदवारांची नागपूर महानगरपालिकेच्या कार्य क्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळयामध्येही (Shift duties) काम करावे लागेल.

१९.१४. निवड झालेल्या उमेदवारांना महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जवाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९.१५. सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यन्तच्या काळात घडणारे बदल उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१९.१६. महानगरपालिकेने वेळावेळी घेतलेले निर्णय संबंधीतावर बंधनकारक असतील

१९.१७. सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, मागास प्रवर्ग/नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या/येणा-या शासन निर्णयाप्रमाणे नागपूर मनपाच्या अग्निशमन व आणिबाणी विभागाचे सेवाप्रवेश नियमानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

## २०. <u>विशेष सूचना</u> :-

१) महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/अभिलेख ही महागनरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व ती गोपनिय मानली जातील.

२) जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

३) मध्यस्त/ठग/नागपूर माहानगरपालिकेच्या संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहे.

४) यापूर्वी सदर पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी जाहिरातीस अनुसरुन पून्हा अर्ज करणे आवश्यक आहे.

२१.१. **<u>परीक्षा केंद्र निवड</u>:-**

२१.१.१. परीक्षासाठी केंद्राच्या उपलब्धतेनुसार उमेदवारास परीक्षा केंद्र व परीक्षा दिनांक तसेच परीक्षा सत्र प्रवेशपत्राव्दारे नेमून देण्यात येईल. याबाबत नागपूर म.न.पाचे त्या त्या वेळचे धोरण व निर्णय अंतिम मानण्यात येईल.

२१.१.२. वरीलप्रमाणे परीक्षा केंद्र निवडीची प्रक्रिया, उमेदवाराने अर्जामध्ये दिलेले पर्याय व उपलब्ध परीक्षा केंद्र या आधारे करण्यात येईल,तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास इतर उपलब्ध परीक्षा केंद्रापैकी परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.याबाबत आयुक्त, महानगरपालिका यांचे निर्णय अंतिम राहील.

OOAcademy Pune 8010457760

२१.१.३. नेमून देण्यात आलेले परीक्षा केंद्र / परीक्षा दिनांक किंवा परीक्षा सत्रात बदल करण्याची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही. तसेच त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेण्यात येणार नाही

२१.१.४. नेमून देण्यात आलेले कोणतेही परीक्षा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या परीक्षा केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या परीक्षा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास, त्याबाबतची सूचना Email किंवा SMS व्दारे तसेच संकेतस्थळावरील सूचनेव्दारे संबंधितांना दिली जाईल.

**२२. सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाईल.**

**२२.१. <u>अराखीव - रुपये १०००/-</u>**

**२२.२. <u>मागासवर्गीय/ आर्थिक दूर्बल घटक/ अनाथ — रुपये ९००/-</u>**

२२.३. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) आहे.

**२२.४. माजी सैनिक उमेदवार साठी परीक्षा शुल्क लागु राहणार नाही.**

२२.५. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित / रद्द झाल्यास पदभरती शुल्क उमेदवारास परत करण्यात येणार नाही.

२२.६. परीक्षा शुल्काचा भरणा हा फक्त Online पध्दतीनेच करावयाचा आहे. यात नमूद केल्याप्रमाणे Online पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने भरणा केलेले परीक्षा शुल्क हे विचारात घेतले जाणार नाही व असा उमेदवार हा परीक्षेसाठी पात्र असणार नाही.

२२.७. परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, यु.पी.आय अथवा नेटबँकिंगव्दारे करता येईल.

२२.८. परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश या कार्यालयाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार होऊन अर्ज **Successfully Submit** झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरुन आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये

२२.९. परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (Status) लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची व अर्ज **Successfully Submit** झाल्याची ,खात्री करणेबाबतची जबाबदारी उमेदवाराची आहे.

२२.१०. परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या /अधिसूचनेच्या अनुषंगाने विहीत दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची या कार्यालयाकडुन दखल घेतली जाणार नाही.

२२.११. उमेदवाराने एका पेक्षा अधिक सेवा अथवा परीक्षेसाठी अर्ज केलेला असल्यास विहित केल्याप्रमाणें प्रत्येक परीक्षा अथवा सेवेसाठी त्याने स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

२२.१२. विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रिये करीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात या कार्यालयाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**२३.१ <u>अर्ज सादर करण्याची प्रक्रिया :-</u>**

**२३.१.१** प्रस्तुत परीक्षेसाठीचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील.

OOAcademy Pune 8010457760

२३.१.२ इच्छुक व पात्र उमेदवाराला वेब आधारित (Web based) ऑनलाईन अर्ज नागपूर महानगरपालिकेचे https:// www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थाळावर विहीत कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

२३.१.३ उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध असणे आवश्यक आहे.

२३.१.४ आनॅलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "New User Registration" यावर Click करून नाव,संपर्काची माहिती, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करून "Submit" बटन दाबावे त्यानंतर उमेदवाराच्या भ्रमणध्वने व ई-मेल आयडी वर OTP येईल सदर OTP टाकल्यानंतर Log-in ID व Password ई-मेल आयडी द्वारे प्राप्त होईल तद्रंतर सदर Log-in ID व Password वापरून उमेदवाराला अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू करता येईल.

२३.१.५ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी.उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी . तसेच विहीत आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर , छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्तीने भरल्यानंतर अर्ज स्वीकृत होईल. एकदा शुल्क भरणा केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

२३.१.६ ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत तसेच उमेदवारांसाठी इतर संबंधीत सविस्तर सूचना https:// www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२३.१.७ Online अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

२३.१.८ अर्जाव्दारे चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

२४.१ **<u>एक किंवा अधिक परीक्षासाठी / सेवांसाठी अर्ज करण्यासाठीचे निकष :-</u>**

२४.१.१ कोणताही उमेदवार हा संबंधित परीक्षतर्गत सेवासाठी विहित करण्यात आलेली अर्हता किंवा पात्रता धारण करीत असल्यास, कोणतीही एक किंवा त्यापेक्षा अधिक संवर्ग परीक्षेसाठी अर्ज सादर करू शकेल. मात्र अशा प्रत्येक परीक्षेसाठी त्याने परीक्षा शुल्क स्वतंत्र भरणा करणे आवश्यक आहे.मात्र एकाच पदासाठी एकापेक्षाअधिक Online अर्ज स्विकारले केले जाणार नाही.

२४.१.२ Candidates who want to apply for Multiple posts can "Submit & Pay" the fees for Single Application First & then can click "+" "Apply Post" Section to apply for other posts using same Registration Number.

२४.१.३ संवर्गनिहाय परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन, आवश्यकता असल्यास अशी परीक्षा एकापेक्षा अधिक दिवशी व एकापेक्षा अधिक सत्रात घेण्यात येईल.एकापेक्षा अधिक सत्र असल्यास प्रत्येक सत्रासाठी अभ्यासक्रमावर आधारीत वेगवेगळी प्रश्नपत्रिका असेल.

२५.१ **<u>सेवा प्रवेशोत्तर शर्ती :-</u>**

नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आणिबाणी विभागाचे सेवाप्रवेश नियम व इतर कायदे/ नियम यानुसार लागू राहील.

OOAcademy Pune 8010457160

२६.१ **प्रवेशपत्राबाबत :-**

२६.१.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या दिनांकानंतर उमेदवाराचे प्रवेशपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेशपत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

२६.१.२ प्रवेशपत्रात दिलेल्या सूचना प्रमाणे उमेदवाराने Online परीक्षा अर्ज भरताना जे छायाचित्र अपलोड केलेले असेल असे छायाचित्र प्रवेशपत्रावर चिकटवून ते परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

२६.१.३ परीक्षेस येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतः चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

२७.१ **परीक्षेस प्रवेश :-**

२७.१.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर https://www.nmcnagpur.gov.in उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे १० दिवस अगोदर उपलब्ध करून देण्यात येईल.त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परीक्षेक्ष्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२७.१.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

२७.१.३ परीक्षेच्या स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट , पॅनकार्ड, किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स,यापैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र तसेच मुळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

२७.१.४ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेश प्रमाणपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेश प्रमाण पत्रावरील सूचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.

२७.१.५ डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सीम कार्ड, ब्लूटूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रोनिक उपकरणे, वहया, नोटस परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, डीजीटल घड्याळ, परीगणक (Calculator) इ. प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत: जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास, ते परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवून त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२७.१.६ म.न.पा परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन / साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधीत परीक्षा केंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन / साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. या संदर्भात कोणत्याही नुकसानीस म.न.पा / परीक्षा घेणारी संस्था किंवा शाळा / महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार असणार नाही.

२७.१.७ सदर वेगवेगळया तरतुदीत काही विसंगती / संदिधता असल्यास त्याबाबत आयुक्त यांचेकडून केलेल्या खुलासा अंतिम निर्णय राहील.

२८.१ **अर्ज सादर करणेसाठी मदत (HELP DESK)**

२८.१.१ भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे, प्रवेशपत्र डाउनलोड करणे यासंबंधी किंवा इतर अडचणी संबंधात उमेदवार मदतकक्षाशी (Help Desk) टोल फ्री क्रमांकावर मदतीसाठी संपर्क करू शकतात. यासाठी (HELP DESK) दूरध्वनी क्रमांक यावर (+९१ ७९९६०९७५५५ ) सोमवार ते शनिवार या दिवशी

OOAcademyPune 8010457760

सकाळी १० वाजता ते ६.०० वाजता संध्याकाळी या कालावधीत संपर्क साधून उमेदवार मदत प्राप्त करून घेऊ शकतात.

२८.१.२ परीक्षासाठी विहित केलेला अभ्यासक्रम तसेच,परीक्षेची रचना व सर्वसाधारण सूचना नागपूर महानगरपालिकेचे https://www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२८.१.३ ही जाहिरात नागपूर महानगरपालिकेचे https:// www.nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**दिनांक :-** ०४/१२/२०२३

डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त *तथा* प्रशासक
महानगरपालिका,नागपूर

OOAcademy Pune 8010457760